नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - ३५० | Issue - 350 | वार शुक्रवार दि. ९ मे २०२५ | Blow- Friday Date 9 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पाकचे ड्रोन हल्ले; भारताच्या एस-४०० ने क्षेपणास्त्रे पाडून दिले प्रत्युत्तर

## ऑपरेशन सिंदूर





## भारताने पाकिस्तानच्या १२ शहरांमध्ये ५० ड्रोन हल्ले केले; हल्ल्यात पाकिस्तानच्या एअर डिफेन्स सिस्टीम उद्ध्वस्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: ऑपरेशन सिंदूरमुळे चिडलेल्या पाकिस्ताननं जम्मूमध्ये हवाई हल्ल्याचा प्रयत्न केला आहे. पाकिस्ताननं जम्मूतील विमानतळावर रॉकेट डागलं. पण भारतानं हा हल्ला हाणून पाडला. भारताच्या एस-४०० हवाई सुरक्षा यंत्रणेनं पाकिस्तानची ८ क्षेपणास्त्रं हवेतच नष्ट करत मोठं नुकसान टाळलं आहे. पाकिस्ताननं सांबा सेक्टरमध्ये मोठ्या प्रमाणात गोळीबार सुरु केला आहे. त्यामुळे जम्मूच्या आरएसपुरा परिसरात ब्लॅक आऊट करण्यात आलेला आहे. इथे सायरन वाजू लागले आहेत. जम्मू शहरातील मोबाईल नेटवर्क बंद झालं आहे. सतवारी कॅम्पमध्ये हल्ला झाल्याची माहिती आहे. कुपवाड्यात गोळीबार सुरु आहे. याशिवाय पंजाबच्या गुरदासपूरमध्येही ब्लॅकआऊट करण्यात आला आहे.

भारतीय सैन्यानं अनेक महत्त्वाच्या ठिकाणी हवाई सुरक्षा यंत्रणा तैनात केली आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून जमिनीवरुन हवेत मारा करता येतो. शत्रूचे क्षेपणास्त्र, ड्रोन हल्ले निष्प्रभ करण्याची क्षमता हवाई सुरक्षा यंत्रणेत आहे. सध्याच्या घडीला भारताची हीच यंत्रणा पाकिस्तानचे हल्ले परतवून लावत आहे. जम्मू विमानतळ, पठाणकोट, अखनूर सेक्टर आणि सांबा परिसरात एस-४०० हवाई सुरक्षा यंत्रणा तैनात आहे. जम्मूच्या विमानतळावरुन लढाऊ विमानं झेपावलेली आहेत.

राजस्थानच्या जसलमेरमध्येही पाकिस्ताननं हल्ला केला आहे. या भागात स्फोटाचा आवाज ऐकू आला आहे. त्यामुळे जसलमेरमध्येही ब्लॅकआऊट करण्यात आला आहे. जसलमेर प्रशासन पूर्णपणे अलर्टवर आहे. जम्मू विद्यापीठ परिसरात दोन ड्रोन पाडण्यात आले आहेत. पंजाबच्या गुरुदासपूरमध्येही ब्लॅकआऊट करण्यात आला आहे. पठाणकोट विमानतळावरही सायरन वाजू लागले आहेत. पठाणकोटच्या सुजानपूरमध्ये ड्रोन दिसला आहे.

भारतीय सैन्यानं परवा रात्री ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. त्यानंतर काल रात्री पाकिस्ताननं भारतावर हवाई हल्ल्याचा प्रयत्न केला.

तब्बल १५ शहरांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रं डागण्यात आली. पण भारताच्या एस-४०० हवाई सुरक्षा यंत्रणेनं प्रभावी कामगिरी करत सगळे हल्ले परतवून लावले. पाकिस्तानी ड्रोन, क्षेपणास्त्रं हवेतच नष्ट करण्यात आली. त्यानंतर आज सकाळी भारतानं ड्रोनद्वारे पाकिस्तानच्या १२ शहरांवर हल्ले चढवले. पाकिस्तानची हवाई सुरक्षा यंत्रणा उद्ध्वस्त केली. त्यानंतर आता पाकिस्तान पुन्हा एकदा भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न करत आहे.

# दहशतवाद्यांच्या जनाज्यात पाकिस्तानचे अधिकारी

## आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानची प्रतिमा मलिन; भारताने फोटो दाखवत पाकिस्तानचे नाक कापले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारत-पाकिस्तान संबंध ताणले गेले आहेत. भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने भारतात हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्याला भारताने परतून लावले. यानंतर भारताने पाकिस्तानच्या १२ शहरांमध्ये ५० ड्रोन हल्ले केले. या हल्ल्यात पाकिस्तानच्या एअर डिफेन्स सिस्टीम उद्ध्वस्त करण्यात आली. या हल्ल्यानंतर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाची अधिकृतपणे पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेत परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव विक्रम मिसरी यांनी एक फोटो दाखवत पाकिस्तानचं नाक कापलं. या फोटोत दहशतवाद्यांच्या अंत्यसंस्कारात पाकिस्तानचे अनेक लष्करी अधिकारी सहभागी असल्याचं बघायला मिळालं. दहशतवाद्यांच्या जनाज्यात पाकिस्तानचे अधिकारी असल्याचे फोटो दाखवत विक्रम मिसरी यांनी पाकिस्तानवर सडकून टीका केली.

विक्रम मिसरी यांनी आज पत्रकार परिषदेत दाखवलेला फोटो हा मुरीदके येथील लष्कर-ए-तैयबाच्या मुख्यालयातील आहे. त्या फोटोत पाकिस्तानी लष्कराचे अधिकारी सुद्धा दिसत आहेत. तसेच यात लष्कर-ए-तैयबाचा कमांडर अब्दुल रऊफ दहशतवाद्यांच्या मृतदेहांसोबत उभा आहे. मिसरी यांनी हा फोटो दाखवत प्रश्न उपस्थित केला आहे. दहशतवाद्यांच्या अंत्ययात्रेत हे कोण उघडपणे फिरत आहेत, ज्यांच्यासोबत पाकिस्तानी लष्कराचे अधिकारी आहेत?, असा सवाल त्यांनी केला आहे. या फोटोमुळे पाकिस्तानचे दहशतवादाशी असलेले संबंध जगासमोर आले आहेत. पाकिस्तान दहशतवाद्यांना मदत करतो हे उघड झाले आहे.

विक्रम मिसरी यांनी पाकिस्तानच्या दुटप्पी धोरणावर टीका केली. दहशतवाद्यांचे अंत्यसंस्कार राष्ट्रीय ध्वजात लपेटलेल्या शवपेट्यांमध्ये केले जातात. त्यांना शासकीय इतमामाने वागणूक दिली जाते, हे आश्चर्यकारक आहे, असं मिसरी म्हणाले. त्यांनी पाकिस्तानला जागतिक दहशतवादाचा चेहरा असल्याचे म्हटले. ओसामा बिन लादेनसारख्या दहशतवाद्यालाही पाकिस्तानने आश्रय दिला. त्याला शहीदचा दर्जा दिला, असंही ते म्हणाले.

मिस्री यांनी जम्मू-काश्मीरमधील पुँछ येथील हल्ल्याचा उल्लेख केला. पाकिस्तानने शीख समुदायाला लक्ष्य केले. एका गुरुद्वारावर हल्ला केला. यात तीन जण मारले गेले. पाकिस्तानकडून सीमाभागात सुरु असलेल्या गोळीबारात आतापर्यंत एकूण १६ नागरिकांचा जीव गेला. अनेक लोक जखमी झाले. पाकिस्तान त्याचा दहशतवादातील सहभाग लपवण्याचा प्रयत्न करत आहे. पण त्यांचे दावे खोटे ठरले आहेत, असंही मिसरी म्हणाले. मंत्र्यांनी त्यांच्या देशात कोणताही दहशतवादी नसल्याचा दावा केला. पण पाकिस्तान जागतिक दहशतवादाचे केंद्र आहे. याचे अनेक पुरावे आहेत. पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांनी आणि माजी परराष्ट्र मंत्र्यांनी दहशतवादी संघटनांशी संबंध असल्याची कबुली दिली आहे, असं मिसरी म्हणाले आहेत. ऑपरेशन सिंदूरनंतर भारताने पाकिस्तानचा खरा चेहरा जगाला दाखवला. मिस्री म्हणाले, पाकिस्तानमध्ये णछ ने बंदी घातलेल्या अनेक दहशतवाद्यांचे घर आहे. याचे जगातील सरकार आणि अधिकाऱ्यांकडे पुरावे आहेत. पाकिस्तान दहशतवाद्यांना मदत करतो, हे आता जगाला माहीत झाले आहे. विक्रम मिस्री यांनी पत्रकार परिषदेत पुरावे सादर केले. त्यामुळे पाकिस्तानची पोलखोल झाली आहे. या खुलासामुळे पाकिस्तान आंतरराष्ट्रीय स्तरावर उघडा पडला आहे. पाकिस्तान नेहमी दहशतवाद्यांना मदत करत आला आहे. ओसामा बिन लादेनला आश्रय देणे हे त्याचे उदाहरण आहे. आता पुँछमधील हल्ल्यातही पाकिस्तानचा हात असल्याचे उघड झाले आहे. पाकिस्तान खोटे दावे करत आहे. पण त्यांचे खरे रुप जगासमोर आले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानची प्रतिमा मलिन झाली आहे. भारताने नेहमी दहशतवादाचा विरोध केला आहे. पाकिस्तान दहशतवाद्यांना मदत करत आहे, हे भारताने जगाला दाखवून दिले आहे, असंही मिसरी यावेळी म्हणाले.

# स्कूल बसमधून विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी नियमावलीत आवश्यक सुधारणा करणार : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासास परिवहन विभागाने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. स्कूल बसमधून शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुखावह झाला पाहिजे, यासाठी नियमावलीत आवश्यक सुधारणा केल्या जातील, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण सभागृह येथे स्कूल बस असोसिएशन व पालक असोसिएशन यांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्यासह परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच असोसिएशनचे प्रतिनिधी उपस्थित होते.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, स्कूल बसमधून विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांनी नियमांचे काटेकोर पालन करावे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात कोणतीही तडजोड केली जाणार नाही. नियमावलीत सुधारणा करताना वाहनचालक आणि पालक संघटनांच्या भावना आणि अडचणींचाही विचार केला जाईल. विद्यार्थ्यांच्या जीविताशी कोणीही खेळू नये. नियमांचे पालन हे फक्त कायद्याच्या भीतीपोटी नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या भावनेतून व्हावे. स्कूल बस वाहतूक नियमावलीत सुधारणा करताना कोणावर अन्याय होणार नाही, पण नियमही शिथिल होणार नाहीत. नियमाचे पालन न करणाऱ्यांना कोणतेही संरक्षण दिले जाणार नाही. परिवहन विभागानेही अनधिकृतपणे विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

अनधिकृत स्कूल बसेसवर कारवाई करणार

सन २०११ च्या नियमावलीनुसार सध्या ४० हजार स्कूल बसेस राज्यभरात सेवा देत आहेत. मात्र या व्यतिरिक्त अनेक स्कूल बसेस विद्यार्थ्यांची धोकादायक पद्धतीने ने-आण करत असल्याच्या तक्रारी प्राप्त होतात. पुढील तीन महिन्यांमध्ये या अधिकृत स्कूलबस चालक-मालकांनी संबंधित प्रादेशिक मोटर वाहन कार्यालयात दंडात्मक रक्कम भरून नियमावलीनुसार आपली स्कूल बस अधिकृत करून घ्यावी. अन्यथा त्यांच्यावर कारवाई केली जाईल. तसेच तीन महिन्यानंतर ज्या प्रादेशिक परिवहन विभागांमध्ये अशा प्रकारच्या अनधिकृत स्कूल बसेस आढळतील त्या प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अधिकाऱ्यांवरही कारवाई केली जाईल असेही परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी सांगितले.

परिवहन आयुक्त श्री. भीमनवार म्हणाले, स्कूल बस धोरण करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. या धोरणातील त्रुटी दूर केल्या जातील. बैठकीत स्कूल बस असोसिएशन व पालक असोसिएशन यांनी मांडलेल्या सूचनांचा धोरणातील नियम सुधारणावेळी विचार केला जाईल.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेद्वारे

# जलसंधारण आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी महत्त्वाचे पाऊल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील जलसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन आणि शेतीला पोषण देणारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतला 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही योजना महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात विकासाचे नवे पर्व घडवते आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे धरणांत साचलेल्या गाळाचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन करून त्याचा पुनर्वापर शिवारांमध्ये करणे. परिणामी, जलसाठ्याची क्षमता वाढवली जाते आणि गाळातील पोषणमूल्ययुक्त माती शेतजमिनीत वापरून जमिनीची सुपीकता सुधारली जाते. ही योजना विशेषतः अल्पभूधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांसाठी वरदान ठरली आहे.

अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी उपयुक्त योजना



गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार ही योजना अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्त्वाची योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून धरणे, बंधारे आणि तलावांमधील गाळ काढून त्या परिसरातील जमिनीवर टाकला जातो.शासन त्यासाठी निधी उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे शेतजमिनीची सुपीकता वाढते आणि पाणी साठवण क्षमता देखील सुधारते. अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे मर्यादित संसाधने असतात, त्यामुळे त्यांना नैसर्गिक साधनसंपत्तीच्या योग्य वापरामुळे थेट फायदा होतो. शासनाचा उद्देशही शेतकऱ्यांना स्वयंपूर्ण करणे व नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत वापर सुनिश्चित करणे हाच आहे. त्यामुळे ही योजना अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी फारच उपयुक्त ठरत आहे.

१ एप्रिल २०२४ ते ७ एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यात १२७४ एकूण ६६.९१ कोटी घनमीटर गाळ काढण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते, त्यापैकी ४२.२९ कोटी घनमीटर गाळाचे उत्खनन पूर्ण झाले असून, हे लक्ष्याच्या ६३ टक्के इतके आहे. ही भरघोस कामगिरी प्रशासनाच्या प्रभावी अंमलबजावणीबरोबरच शेतकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शक्य झाली आहे.

राज्य शासनाकडून २७८१.८ कोटी रुपये निधीची तरतूद

योजनेसाठी राज्य शासनाकडून २७८१.८ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली असून, आतापर्यंत १५४९.९ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. यामध्ये ३५,२०५ शेतकऱ्यांपैकी ३१,७१९ शेतकरी अनुदानासाठी पात्र ठरले असून, त्यांनी ३४.१७ कोटी घनमीटर गाळ काढला आहे. यासाठी १२२१.६ कोटी रुपयांचे अनुदान अपेक्षित असून, आतापर्यंत ५१२.४ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

उपक्रमामुळे १०.०६ लाख एकर क्षेत्रावर पोषणमूल्ययुक्त माती

या उपक्रमामुळे १०.०६ लाख एकर क्षेत्रावर पोषणमूल्ययुक्त माती टाकण्यात आली आहे, जी शाश्वत शेतीसाठी एक मोठा टप्पा आहे. विशेषतः अल्पभूधारक, गरीब शेतकऱ्यांना त्यांची जमीन पुन्हा उत्पादक बनवण्याची संधी या योजनेमुळे मिळत आहे.

शेतकऱ्यांच्या समृद्धीची गाथा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१६ मध्ये या योजनेचा प्रारंभ करताना स्पष्ट केले होते की, ही योजना केवळ गाळ काढण्यापुरती मर्यादित नाही, तर ती जलसंवर्धन, जमिनीची सुपीकता आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीची गाथा आहे. आज, त्यांच्या या दूरदृष्टीला राज्यातील लाखो शेतकऱ्यांनी दिलेला प्रतिसाद हे या योजनेचे यश अधोरेखित करतो.

ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक आणि पर्यावरणीय उत्थानाचे प्रेरणास्थान

राज्य शासनाने या योजनेसाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला असून, शेतकऱ्यांना संपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहभागी बनवले आहे. 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही योजना आता केवळ जलसंधारण उपक्रम नसून, ती ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक आणि पर्यावरणीय उत्थानाची प्रेरणास्थान बनली आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### दुटप्पी धोरणावर टीका

भारत-पाकिस्तान संबंध ताणले गेले आहेत. भारताच्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने भारतात हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्याला भारताने परतून लावले. यानंतर भारताने पाकिस्तानच्या १२ शहरांमध्ये ५० ड्रोन हल्ले केले. या हल्ल्यात पाकिस्तानच्या एअर डिफेन्स सिस्टीम उद्ध्वस्त करण्यात आली. दरम्यान विक्रम मिसरी यांनी आज पत्रकार परिषदेत दाखवलेला फोटो हा मुरीदके येथील लष्कर-ए-तैयबाच्या मुख्यालयातील आहे. त्या फोटोत पाकिस्तानी लष्कराचे अधिकारी सुद्धा दिसत आहेत. तसेच यात लष्कर-ए-तैयबाचा कमांडर अब्दुल रऊफ दहशतवाद्यांच्या मृतदेहांसोबत उभा आहे. मिसरी यांनी हा फोटो दाखवत प्रश्न उपस्थित केला आहे. दहशतवाद्यांच्या अंत्ययात्रेत हे कोण उघडपणे फिरत आहेत, ज्यांच्यासोबत पाकिस्तानी लष्कराचे अधिकारी आहेत?, असा सवाल त्यांनी केला आहे. या फोटोमुळे पाकिस्तानचे दहशतवादाशी असलेले संबंध जगासमोर आले आहेत. पाकिस्तान दहशतवाद्यांना मदत करतो हे उघड झाले आहे. विक्रम मिसरी यांनी पाकिस्तानच्या दुटप्पी धोरणावर टीका केली. दहशतवाद्यांचे अंत्यसंस्कार राष्ट्रीय ध्वजात लपेटलेल्या शवपेट्यांमध्ये केले जातात. त्यांना शासकीय इतमामाने वागणूक दिली जाते, हे आश्चर्यकारक आहे, असं मिसरी म्हणाले. त्यांनी पाकिस्तानला जागतिक दहशतवादाचा चेहरा असल्याचे म्हटले. ओसामा बिन लादेनसारख्या दहशतवाद्यालाही पाकिस्तानने आश्रय दिला. त्याला शहीदचा दर्जा दिला, असंही ते म्हणाले. मिस्री यांनी जम्मू-काश्मीरमधील पुँछ येथील हल्ल्याचा उल्लेख केला. पाकिस्तानने शीख समुदायाला लक्ष्य केले. एका गुरुद्वारावर हल्ला केला. यात तीन जण मारले गेले. पाकिस्तानकडून सीमाभागात सुरु असलेल्या गोळीबारात आतापर्यंत एकूण १६ नागरिकांचा जीव गेला. अनेक लोक जखमी झाले.

# धैर्यशील मोहिते पाटील, माढा तालुक्याचे आमदार अभिजीत पाटील यांची विशेष बैठक

## वर्षानुवर्ष प्रलंबित असलेल्या समस्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : खा. धैर्यशील मोहिते पाटील यांचे अध्यक्षतेखाली करमाळा व माढा व पंढरपूर तालुक्यातील गावांच्या विविध समस्या संदर्भात जिल्हा नियोजन भवन येथे जिल्हाधिकारी सोलापूर यांचे प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली यावेळी माढा तालुक्याचे आमदार अभिजीत पाटील यांचे सह संबंधित विषयाचे अधिकारी उपस्थित होते सदर बैठकीत खालील विषयावर वादळी चर्चा होऊन वर्षानुवर्ष प्रलंबित असलेल्या समस्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची निर्देश देण्यात आली.



संबंधित तालुक्यातील काही पुनर्वसित गावांची नकाशे उपलब्ध नाहीत ते आठ दिवसाच्या आत उपलब्ध करून देण्याची निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना दिल्या आहेत तसेच ज्या प्लॉट धारकांचा सातबारा उताऱ्यावरून नोंदी लागलेल्या नाही त्या लावण्याचे सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

पुनर्वसन गावठाणा लोकांना दिलेली प्लॉट चे आदेश सनद वर असणारे प्लॉट नंबर सिटी सर्वेचे नंबर व ग्रामपंचायतचे घर नंबर वेगवेगळ्या असल्याने कर्ज घेणे वारस नोंद करताना अडचणी येत होते त्यासाठी तिन्ही विभागाचे तर्फे सुसूत्रीकरण करून एकच नंबर प्लॉटला देण्यात यावा तसेच सरकारी मोजणी करून प्लॉट शेत्र हद्द निश्चित करण्यात सर्व विभागात समन्वय साधून एक सूत्र तथा आणण्याची निश्चित करण्यात आले.

**सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ६४ पुनर्वशीत गावठाणे आयडिया गावठाणांना पुनर्वसन कायद्याअंतर्गत १८ नागरिक सुविधा दे असतात यासाठी एकदाच निधी देता येतो १८ पैकी किमान ११ सुविधा पूर्ण असतील तर त्यांची जिल्हा परिषदेकडे हस्तांतरण होऊन देखभाल दुरुस्ती होते. बहुतांश गावात किमान ११ सुविधा पूर्ण नसलेले आणि जिथे ११ सुविधा पूर्ण आहेत परंतु त्या २५/ तीस वर्षांपूर्वीच्या आहेत त्या देखभाल दुरुस्ती अभावी जीर्ण झालेले आहेत परिणामी जिल्हा परिषद हस्तांतरण करून घेत नव्हती त्यावर हस्तांतरण करून घेण्यात जिल्हा परिषद सोलापूर यांनी संमती दर्शविली.**

उजनी प्रकल्प अंतर्गत करमाळा तालुक्यातील खादगाव एक दोन तीन चिकलठाण एक दोन सांगवी एक दोन स्वभाव पूर्व पश्चिम बिटरगाव केतुर एक दोन वांगी चार घोरवाडी या गावाचे पुनर्वसनामुळे दोन भाग झालेले आहेत भौगोलिक दृष्ट्या ही गावी भिन्न आहेत एका भावातून दुसऱ्या भागाकडे जाताना काही ठिकाणी पंधरा किमी अंतर पार करावे लागत आहे कार्यालय एका भागात असल्याने नागरिकांना सुविधा मिळत नाही ही गावी पुनर्वसन कायद्यातील लोकसंख्येचे अट पूर्ण करतात त्यामुळे हद्द निश्चित करून त्यांचे विभाजन करून वेगळ्या ग्रामपंचायत स्थापन करण्यासंदर्भातील कार्यवाही सुरू करण्यात जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना आदेश दिले.

सीना कोळेगाव प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रामध्ये भूसंपादनाने दृष्टीने काही शेतकऱ्यांच्या जमिनीवर शेरे मारलेले आहेत पण अजून संपादन केलेली नव्हती अशी कार्यवाही नाही तरीही लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या जमिनीवरील शेरे पूर्णपणे उठवलेली नाही शेरे उठवण्यासंदर्भात त्वरित कार्यवाही करण्याची जिल्हाधिकारी निर्णय दिले.

तसेच पुनर्वशीत गावठाणांचे विद्युतीकरणाच्या समस्या सोडवण्याचे संबंधितांना निर्देश देण्यात आले चर्चा झालेल्या मुद्द्यावर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात येत आहे आले आहे याचे अपडेट घेण्यासाठी पुन्हा दहा दिवसांनी बैठक घेण्यात येणार असल्याचे सांगितले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा

# प्रत्येक नागरिकाने आपत्ती व्यवस्थापन आणि बचावाचे धडे घेतले पाहिजेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**'आयटीआय' मध्ये नव्या सहा अभ्यासक्रमाचीही घोषणा**

**'आयटीआय'च्या विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे**

मुंबई : आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. आपत्ती मानव निर्मित असो किंवा नैसर्गिक याचे व्यवस्थापन आणि बचाव कसा करावा, याचे प्रशिक्षण प्रत्येक नागरिकाने घेतले पाहिजे, असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.



जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान सीमेवरील तणावाच्या पार्श्वभूमीवर कौशल्य विकास विभाग आणि अनिरुद्धाज अॅकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील आयटीआयच्या विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्यात येत आहेत. मंत्री श्री. लोढा यांच्या हस्ते ठाणे येथील राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आपत्ती व्यवस्थापना विषयीच्या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. राज्यातल्या सर्व औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात ऑनलाईन आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यशाळा होणार आहेत.

मंत्री श्री. लोढा म्हणाले की, मानवाने प्रगती केली असली तरी, आपत्तीचे स्वरूप ही बदलले असून या पार्श्वभूमीवर बचावाचे प्रशिक्षण नव्या पिढीला देण्याचा उद्देश आहे. 'आयटीआय' मध्ये सहा नव्या अभ्यासक्रमाची घोषणा केली. यात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ईव्ही इलेक्ट्रिक वाहन व्यवस्थापन, इंडस्ट्रिअल रोबोटिक्स आणि थ्री डी प्रिंटिंग, ड्रोन तंत्रज्ञान, सोलर टेक्निशियन या अभ्यासक्रमांचा समावेश असून येत्या शैक्षणिक वर्षापासूनच याची सुरुवात होणार आहे.

दोन दिवसीय शिबिरात अनिरुद्धाज अॅकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील मंत्री यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. तर राज्याचे माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित यांनी आयटीआय विद्यार्थ्यांना नागरी संरक्षण या विषयावर ऑनलाईन कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतल्या शिबिराच्या सुरुवातीला डॉ. लीना गडकरी यांनी आपत्ती व्यवस्थापन संकल्पना सांगितली. या दोन दिवसीय शिबिरात बचाव आणि मदतकार्य याचे प्रशिक्षणही देण्यात येणार आहे. मानवनिर्मित आपत्ती यात युद्धाचा समावेश असून त्या काळात घ्यायची काळजी, उपचार आणि बचाव यावरही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. बचावाची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांनी सादर केली. राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य श्रीमती. एस.एस. माने यांनी आभार व्यक्त मानले.

# आश्रमशाळांच्या समस्या प्राधान्याने सोडविणार : मंत्री अतुल सावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आश्रमशाळांच्या माध्यमातून चांगले विद्यार्थी घडविण्यासाठी प्रयत्न होत असतात. त्यामुळे इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या विमुक्त जाती आणि भटक्या जमाती (विजाभज) प्रवर्गाच्या निवासी आश्रमशाळांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यात येणार असल्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या खासगी अनुदानित निवासी आश्रमशाळांतील अडचणींबाबत मंत्रालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीस इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच निवासी आश्रमशाळाचे संस्थाचालक उपस्थित होते.



मंत्री श्री. सावे म्हणाले, आश्रम शाळांच्या प्रलंबित अनुदानाचे वितरण टप्प्याटप्प्याने लवकरच करण्यात येईल. संचमान्यताबाबत शिक्षण विभागासोबत बैठक घेण्यात येईल. संचमान्यता व वेतन अनुदानासाठी प्रस्ताव तयार करावेत संचमान्यता प्रक्रियेनंतरच रिक्त पदांची यादी तयार करावी. आश्रम शाळांच्या संस्थाचालकांनी मांडलेल्या समस्या सोडविण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. शासनाच्या सीएमश्री योजनेत आश्रमशाळांचा समावेश करण्याबाबत प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी संबंधितांना दिल्या तसेच आश्रम शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांचे आयुष्मान भारत कार्ड काढून घ्यावे. तसेच विद्यार्थ्यांसाठी राज्य, विभाग आणि जिल्हास्तरावर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करावे,असेही त्यांनी यावेळी सांगितले. या बैठकीत आश्रम शाळेत महिला अधीक्षकांची नियुक्ती, रिक्त पदांची भरती, आश्रम शाळांमध्ये सौरऊर्जेचा वापर, सीएमश्री योजनेत समावेश, क्रीडा स्पर्धांचे आयोजन, आश्रम शाळा संहिता याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

# शासकीय कामकाजाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाची जोड आवश्यक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**'टेक वारी – महा तंत्रज्ञान प्रशिक्षण सप्ताह' मध्ये तज्ज्ञांचे मत**

मुंबई : शासकीय कामकाजामध्ये अत्याधुनिक फ्रंटियर तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर हा केवळ एक पर्याय नसून भविष्यातील गरज ठरणार आहे, असे मत 'टेक वारी – महा तंत्रज्ञान प्रशिक्षण सप्ताह' अंतर्गत चौथ्या दिवशी 'शासकीय कामकाजात फ्रंटियर तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर' या विषयावर झालेल्या पहिल्या सत्रात तज्ज्ञांनी व्यक्त केले. या सत्रात नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी, विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह आदी मान्यवर उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत एआय, मशिन लर्निंग, डेटा सायन्स, जीआयएस आणि ब्लॉकचेन सारख्या तंत्रज्ञानाचा वापर प्रशासकीय कामकाजासाठी केला जात असल्याचे सांगितले. ई-गव्हर्नन्स अंतर्गत ई -ऑफीस, जीआयएस एनबल्ड ईपीआर ड्रोन सर्व्हेद्वारे प्रॉपर्टी टॅक्स मूल्यांकन, डेटा सेंट्रलायझेशन, फील्ड ॲक्टिव्हिटीजचे मॉनिटरिंग यासंदर्भातील कार्यप्रणालीही त्यांनी स्पष्ट केली.

नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी नैसर्गिक आपत्तीमधील नुकसानीचे मूल्यांकन तंत्रज्ञानाच्या मदतीने कसे अधिक कार्यक्षम होऊ शकते, याचे उदाहरण 'ई-पंचनामा प्रणाली' द्वारे स्पष्ट केले. या प्रणालीमुळे थेट लाभ हस्तांतरण, ई पिक पाहणी, राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण आणि मदत वितरण या साऱ्या प्रक्रिया सुलभ व पारदर्शक बनल्या आहेत. मोबाईल ॲप व पोर्टलद्वारे मिळणाऱ्या डेटाच्या आधारे निर्णय प्रक्रिया अधिक जलद व अचूक होऊ शकते असेही त्यांनी यावेळी सांगितले.

नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी सिंहस्थ कुंभमेळा, तुळजापूर मंदिर संस्थान, वाळू उत्खनन आणि राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण यांसारख्या प्रकल्पांमध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करण्यात आला याचे उदाहरणे दिली. जीआयएस, पिंग काउंट, जन स्वास्थ्य व्यवस्थापन इ. माध्यमातून कार्यपद्धतीचे संपूर्ण मॉनिटरिंग शक्य झाले. आयुष्मान भारत डिजिटल मिशन, युपीआय, ॲग्री स्टॅक याबाबतही त्यांनी माहिती दिली. तंत्रज्ञानाच्या प्रभावी अंमलबजावणीपूर्वी संबधित तंत्रज्ञानाची शाश्वतता, विस्तारक्षमता आणि अनुकरणीय आहे का याबाबतही खात्री करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या सत्रात सहभागी तज्ज्ञांनी शासकीय यंत्रणांमध्ये तंत्रज्ञानाचे महत्व पटवून देत त्याद्वारे कार्यक्षमता, पारदर्शकता आणि जलद सेवा वितरण कसे शक्य होते याची सखोल माहिती दिली. यामुळे आगामी काळात शासकीय धोरणांची अंमलबजावणी अधिक सक्षम, डिजिटल आणि लोकाभिमुख होणार असल्याचे स्पष्ट झाले. यावेळी महाराष्ट्र सदनच्या आयुक्त आर. विमला यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

**महाराष्ट्र सायबरच्या चॅटबॉट व माहितीपटाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

# सायबर गुन्हे व फसवणूक टाळण्यासाठी अधिक परिणामकारपणे काम करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सायबर सुरक्षेसाठी देशातील अत्याधुनिक सुविधा महाराष्ट्रात आहेत. या माध्यमातून सायबर गुन्हे, सायबर फसवणूक व मानवी तस्करीपासून लोकांना वाचविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.या पुढील काळातही अधिक परिणामकारपणे काम करणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केले.

मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र सायबरच्या आर्टिफिशियल इंटिलिजन्स बॉट व सायबर जागरुकता माहितीपट या नाविन्यपूर्ण नागरिक केंद्रीत उपक्रमांचे अनावरण सह्याद्री अतिथिगृहात करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र सायबरचे अतिरिक्त पोलीस महासंचालक यशस्वी यादव, पोलीस उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे, पोलीस अधीक्षक हेमराजसिंग राजपूत, अभिनेता शरद केळकर, अभिनेत्री अमिषा पटेल, मुख्यमंत्री कार्यालयाचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी सायबर सुरक्षा विषयक माहितीपट दाखविण्यात आला. मराठी आणि हिंदी भाषेत असलेल्या या माहितीपटात अभिनेते शरद केळकर, अभिनेत्री अमिषा पटेल यांनी काम केले आहे. या माध्यमातून सायबर गुन्हेगारी, सायबर फसवणूक संबंधी जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र सायबरच्या कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित चॅट बॉटचे सादरीकरण करण्यात आले. हा चॅटबॉट महाराष्ट्र सायबरच्या १९४५ या हेल्पलाईनशी जोडले गेले आहे. या चॅटबॉटमध्ये सायबर गुन्हे, तक्रार कशी करावी, यासंबंधीची माहिती मिळणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सायबर फसवणुकीसंबंधीचे कॉल्स मोठ्या प्रमाणात येत असतात. त्या सर्वांना सावधानतेले उत्तर देणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा कॉल्सना उत्तरे देणे व नागरिकांना माहिती मिळण्यासाठी चॅटबॉट व माहितीपट महत्त्वाचे ठरणार आहे. सायबर गुन्हे घडण्यापूर्वीच रोखण्यासाठी जनजागृती आवश्यक आहे. अशा कामात अभिनेते शरद केळकर व अभिनेत्री अमिषा पटेल यांच्यासारख्यांनी सहभाग घेतल्यामुळे नागरिकांपर्यंत चांगला संदेश जाईल.



नोकरीच्या निमित्ताने परदेशात नेऊन विक्री करण्यासारख्या घटना रोखण्यासाठीही यापुढील काळात जनजागृती करावी. मानवी तस्करीसारखे अमानुष प्रकार बंद करण्यासाठी जनजागृती उपक्रम महाराष्ट्र सायबरने हाती घ्यावा, अशी सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केली.

अभिनेते श्री. केळकर म्हणाले की, सायबर गुन्हे व सायबर सुरक्षा विषयक जनजागृती करणे आवश्यक आहे. या उपक्रमात सहभागी झाल्याचा आनंद असून या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जनजागृती होईल. महाराष्ट्र सायबरने सुरू केलेला सायबर सुरक्षाविषयक हेल्पलाईन क्रमांक सध्याच्या काळात उपयुक्त आहे. श्रीमती पटेल म्हणाल्या की, डिजिटायझेशनच्या या युगात सायबर गुन्हेगारीच्या घटनांना आळा घालणे आवश्यक आहे. त्यासाठी लोकांमध्ये जागृती महत्त्वाची आहे. त्यामुळे महाराष्ट्र सायबरने घेतलेले जनजागृतीचा उपक्रम आजच्या काळात महत्त्वाचे आहे.

मानवी तस्करीतून सुटका झालेल्या तरुणाने मानले महाराष्ट्र सायबरचे आभार

महाराष्ट्र सायबरने नुकतेच नोकरीच्या निमित्ताने म्यानमार व लाओस या देशांमध्ये गुलाम म्हणून विकल्या गेलेल्या ६४ जणांना सुखरूप सोडवून आणले आहे तसेच पाच एजंटनाही अटक केली. मानवी तस्करीतून सुटका झालेल्या एका तरुणाने यावेळी त्याच्यावर आलेल्या प्रसंगाची माहिती दिली व महाराष्ट्र सायबरने वेळीच केलेल्या कारवाईमुळे सुटका झाल्याचे समाधान व्यक्त केले. या मोहिमेची माहिती पोलीस अधीक्षक श्री. राजपूत यांनी दिली.

यावेळी श्री. धवसे यांनी महाराष्ट्र सायबरच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. अतिरिक्त पोलीस महासंचालक श्री. यादव यांनी जनजागृती उपक्रमाची माहिती दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर विकास आराखडा; मालमत्ताधारकांनी सर्व्हेक्षणास सहकार्य करावे :प्रशासनाचे आवाहन

## १२ पथकाव्दारे प्राथमिक सर्व्हेक्षण, पथकात वरीष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी व नगरपालिका कर्मचाऱ्यांचा समावेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरला आषाढी आणि कार्तिकी एकादशीला लाखो आणि दररोज मोठ्या संख्येने भाविक येतात. पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना व स्थानिक नागरिकांना पायाभूत सुविधा देण्यासाठी पंढरपूर विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. यासाठी प्राथमिक सर्व्हेक्षण करण्यात येत असून, १२ पथकाव्दारे मालमत्तांचे सर्व्हेक्षण करण्यात येत आहे. संबधित मालमत्ताधारकांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या पथकास योग्य माहिती देवून सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.





पंढरपूर येथील विकास आराखड्याबाबत स्थानिक नागरिक, व्यापारी विक्रेते, महाराज मंडळी यांच्याशी प्राथमिक चर्चा करून समस्या जाणून घेण्यासाठी केबीपी कॉलेज, पंढरपूर येथे दि. ०१ मे व ०२ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी चर्चा केली होती. त्याअनुषंगाने प्राथमिक सर्व्हे आज गुरुवार दि. ८ मे २०२५ पासून सुरु करण्यात आला आहे. सदर सर्व्हे १२ पथकाव्दारे करण्यात येत असून, या पथकात केबीपी कॉलजचे वरीष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी, पंढरपूर नगरपालिकेचे अधिकारी- कर्मचारी यांचा समावेश आहे. सदरचे सर्व्हेक्षण प्राथमिक असून, ६३० मालमत्ताधारकांचा सर्व्हे करण्यात येणार आहे. सर्व्हेक्षणामुळे बाधित नागरिकांचे सामाजिक, आर्थिक परिणामांची माहिती गोळा होणार असल्याने, विकास आराखड्याची व्याप्ती लक्षात घेवून संबधितांना विश्वासात घेवून द्यावयाची भरपाई व पुनर्वसन याबाबत प्रस्ताव तयार करण्यात येणार येईल. बाधितांची कमीत कमी जागा घेऊन जास्तीत जास्त लाभ कसा देता येईल याबाबतही प्रयत्न करण्यात येणार आहे.

**सुमारे ६३० मालमत्ताधारकांची घेण्यात येणार माहिती**

पंढरपूर विकास आराखड्यातील बाधितांची सर्व्हे पथकाकडून संबधित मालमत्ता धारकांचे नांव, वय, जातीचा प्रवर्ग, व्यवसाय, जागेचे क्षेत्रफळ, नगर भूमापन क्रमांक, मिळकत पत्र, भाडेकरुचे नांव, कुळ, बाधित जागेचे मंदिरापासून अंदाजे अंतर, महत्वाच्या रस्तत्यापासून असलेले अंतर, बाधित जागेची दर्शनी बाजू, बांधकामाचे वर्णन व प्रकार, जागा कोणत्या कारणासाठी वापरात आहे. व्यवसायासाठी असाणाऱ्या जागेचा कधीपासून वापर करण्यात येत आहे. प्रमुख चार वाऱ्यांमध्ये व्यावसायिक वापरांतून होणारे अंदाजे उत्पन्न, संपादनामुळे बाधित होणारे उत्पन्न, पुनर्वसनाचा लाभ अपेक्षित आहे का? पुनर्वसनासाठी पसंतीचे ठिकाणे, मालमत्तेच्या अनुषंगाने मालक आणि भाडेकरु तसेच कूळ यांच्यामध्ये जागेबाबत वाद आहे का? मालमत्तेवर कर्ज गहाणखत बोजा, पुर्नवसन दरम्यान तात्पुरत्या घरांची गरज तसेच पुनर्वसन प्रक्रियेबाबत सुचना व अभिप्राय आदीबाबत माहिती सर्व्हेक्षण पथकाकडून गोळा करण्यात येणार आहे.

---

**थोडक्यात...**




## टूर्स बुकिंग करण्याच्या नावाखाली लाखो रुपये घेऊन फरार

सोलापूर (प्रतिनिधी) ट्रॅव्हल्स टूर्स बुकिंग करण्याच्या नावाखाली फिर्यादीच्या करंट खात्यातून ३१ लाख ३३ हजार रुपये घेऊन तोतया इसम फरार झाला.

या घटनेची हकीकत अशी की, फिर्यादी विशाल विजय हुंडेकरी (रा.स्नेहल पार्क,जुळे सोलापूर) यांचे टूर्स ट्रॅव्हल्स ऑफिस असून त्यामध्ये संशयित आरोपी शैलेश आप्पा बिडवे हा आला. व मी इन ऑटो हॉलिडेज कंपनीचा सोलापूरचा प्रतिनिधी असल्याचे सांगितले.त्यानंतर त्याने फिर्यादीस कंपनीचे माहितीपत्रक दिले.तसेच आमचे दुबई, थायलंड, व दिल्ली येथे ऑफिस असल्याचा बाहणा केला. जगभरात ट्रॅव्हल्स कंपनीसाठी विमान तिकिटे,बसेस, हॉटेल्स जेवणाची सोय करून देत असल्याचे सांगितले.व आपल्या सोबत सुद्धा होलसेल दरामध्ये काम करू असा विश्वास संपादन केला. या विश्वासास भुलुन हुंडेकरी यांनी संशयित आरोपी बरोबर तोंडी करार करून दोन ट्रिप यशस्वीरित्या पूर्ण केल्या. त्यामुळे संशयित आरोपीवर अधिकच विश्वास बसला. त्यानंतर मात्र संशयित आरोपीने ५ ट्रीपचे ३१ लाख ३३ हजार रुपये फिर्यादीच्या करंट अकाउंट मधून घेऊन फरार झाला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सदर बझार पोलीस ठाण्यात शैलेश बिडवे (रा.मेहकर,तालुका पालखी जिल्हा बिदर) याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक काटे हे करत आहेत.

**अज्ञात चोरट्याने पळविली दुचाकी**

सोलापूर : छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून हॅन्डल लॉक करून ठेवलेली मोटार सायकल क्रमांक एम एच २५ बी बी ९८४३) ही चोरून नेल्याची घटना सोमवारी (दि. ५) घडली. याप्रकरणी आकाश सुरेश चौधरी (वय १८, रा. सिध्दार्थ नगर, शुक्रवार पेठ) याने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

---

# अक्कलकोटमध्ये घुमणार धम्माचा जागर..!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा अक्कलकोट च्यावतीने बौद्ध धम्म परिषद व बौद्धाचार्य श्रामणेर शिबिर पार पडत आहे

दिनांक १० मे २०२५ रोजी बौद्धाचार्य श्रामणेर शिबिराचे उदघाटन हसापूर येथे संपन्न होईल, हे शिबिर दहा दिवसीय निवासी शिबिर असेल.

यामध्ये बौद्ध धम्म संघ, बौद्ध जीवनाची पद्धती, पारमिता, अष्टांगिक मार्ग, बौद्ध धार्मिक स्थळे, मंगल उत्सव सण, जगाचा अनेक धर्माचा तुलनात्मक अभ्यास, संपूर्ण विधीची प्रात्यक्षिके, अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी प्रत्यक्ष प्रयोगातून सादरीकरण,डॉ.बाबासाहेब आंबेडकर धम्मक्रांती याच बरोबर लोकशाही मजबूत करणारे भारतीय संविधान, ध्यान आणि विपश्यना यासारख्या ध्यानपद्धती शिकविले जातात बौद्ध धम्माचे विविध विषय तत्त्वज्ञान सांगितले जाते. अशा विविध धार्मिक कार्यक्रम या शिबिरामध्ये संपन्न होतील तसेच या कार्यक्रमाचा समारोप १९ मे २०२५ बौद्ध धम्म परिषद ने होईल.

**हसापूर येथे बौध्द धम्म परिषद व बौध्दाचार्य श्रामणेर शिबिर**

यासाठी जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब वाघमारे, पूज्य भन्ते.बी.सारीपुत्त

तसेच अनेक धम्म गुरूंचा या शिबिरामध्ये मार्गदर्शन सहभाग लाभेल.

याची संपूर्ण माहिती बौद्धाचार्य साहिल कांबळे तालुकाध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा अक्कलकोट यांनी दिली.

---



# पोमादेवी जवळगा येथील विद्यानिकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा ८९% निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा/अमर जाधव : औसा तालुक्यातील जळगाव पोमादेवी येथील विद्यानिकेतन माध्यमिक उच्च व उच्च माध्यमिक विद्यालय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक पर्वणी असून ग्रामीण भागातील विद्यार्थी विद्यानिकेत माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेतात तसंच गेल्या तीस वर्षापासून शंभर टक्के निकालाची परंपरा राखणारे विद्यालय असून विद्यालयात उच्च दर्जाचे शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येते तसेच परीसरातील सर्वसामान्य सर्वसामान्य शेतकरी वर्गातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अग्रगन्य संस्था मनुनही विद्यानिकेतन माध्यमीक व उच्च माध्यमिक विद्यालयाकडे पाहील जात ,,,,

औसा तालुक्यातील जवळगा पोमादेवी येथील विद्यानिकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावीचा निकाल लागला यामध्ये बारावी कला शाखेचा ९०.६२% वाणिज्य शाखेचा ९४.७३% कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी ८५.७१ मार्केटिंग अँड रिटेल मॅनेजमेंट.

तर क्रॉपसायन्स चा ७५% निकाल लागला असून कला शाखेमध्ये कुमारी हजारे चांदणी उमाकांत ८०% टक्के गुण घेऊन प्रथम आली आहे वाणिज्य शाखेत समदडे सुरज दत्ता ६७.६७% गुण घेऊन प्रथम आला आहे कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी गिरी राजाबाई स्वराज ६५.६७% गुण घेऊन प्रथम आली आहे मार्केट अँड डिटेल मॅनेजमेंट मध्ये सुरवसे श्रीदेवी शिवाजी ६७.३३% गुण घेऊन प्रथम आली आहे तर क्रॉप सायन्स मध्ये वाकुरे सायली वेंकटेश ७५.६७ %गुण घेऊन प्रथम आली असून

विद्यालयाचा निकाल ८९% लागला आहे. विद्यार्थ्यांचा सत्कार शाळेचे सचिव मा.श्री . डॉ फडणिस आनिल रघुनाथराव यांचा हस्ते उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला .तसेच१००% निकालाची ची परंपरा राखण्याचा संकल्प आसल्याचे प्राचार्यांनी सांगीतले यावेळी संस्था सचिव अनिल फडणीस, प्राचार्य शाहूराज राजगावे व शिक्षक, पांडे एस एम, श्रीमंती पाटिल पी .आर .निकम आय. एस. महामुनी एस. डी. लकड़े एस .सी . राजगावे एस .व्हि. काकडे डि. एस. मगरुळे आर. डी . सह विद्यार्थी पालक व शिक्षक उपस्थित होते.

---

# भिवंडी वकील संघटनेच्या निवडणुकीत अॅड. किरण चन्ने यांचा दणदणीत विजय



ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : चुरशीच्या झालेल्या भिवंडी वकील संघटनेच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनेलचे अँड किरण चन्ने यांनी दणदणीत विजय मिळविला आहे.अध्यक्ष पदासाठी बुधवारी झालेल्या निवडणुकीत अँड किरण चन्ने यांनी अँड मनजीत राऊत यांचा २०९ मतांनी पराभव केला आहे.अँड किरण चन्ने यांना ५७३, अँड मनजीत राऊत यांना ३६४ तर तिसरे उमेदवार अँड. सुनील पाटील यांना अवघ्या ४८ मतांवर समाधान मानावे लागले.

या निवडणुकीत कार्यकारी मंडळावर उपाध्यक्ष पदी अँड. सुधीर भोईर, सचिव पदी अँड. प्रदीप मते,ह सचिवपदी अँड. अफिफ मोमीन, खजिनदारपदी अँड.कल्पेश ठाकूर हे निवडून आले असून बार असोसिएशन सदस्यपदी अँड.प्रमोद भालेकर, अँड.चांदबी मुजावर,अँड.अतुल भालेराव, अँड. अनिल राठोड, अँड.लखन कांबळे तर महिला प्रतिनिधी म्हणून अँड.सपना भगत या विजयी झाल्या आहेत. अँड.किरण चन्ने यांच्या विजयानंतर न्यायालय परिसरात रात्री उशिरा वकिलांसह समर्थक कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष साजरा केला.

भिवंडी वकील संघटनेच्या निवडणुकीत मिळविलेला विजय हा परिवर्तन शील विचारांचा विजय असून सर्व वकिलांनी केलेल्या सहकार्यातून ही शक्य झाले असून, सर्वांना सोबत घेऊन संघटनेचे काम पुढे करत राहणार अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित अध्यक्ष अँड.किरण चन्ने यांनी दिली आहे.

---

# कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता ११ वीचे प्रवेश ऑनलाईन


सोलापूर/जिमाका : माहे जून २०२५ पासून इ. ११ वी कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रवेशाची व्याप्ती राज्यस्तरीय वाढविण्याच्या दृष्टीने इ.११ वी चे सर्व प्रवेश ऑनलाईन होणार आहेत. सदर प्रवेशासंदर्भात कनिष्ठ महाविद्यालय व उच्च माध्यमिक शाळांची माहिती घेण्याचे काम चालू आहे. याबाबत पुणे विभागाच्या सहाय्यक शिक्षण उपसंचलाक ज्योती परिहार यांनी जिल्हयातील सर्व प्राचार्याची व्हिसी घेऊन, माहिती देण्यात आली. सर्व मुळ कनिष्ठ महाविद्यालयांची मान्यता, तुकडी मान्यता इ. माहिती घेण्याचे काम चालू असून पुढील ऑनलाईन काम पुणे विभागातर्फे चालू आहे. तरी सर्व पालकांनी प्रवेशासाठी आवश्यक ते सर्व दाखले सेतू कार्यालयातून तात्काळ काढून घ्यावेत म्हणजे ऑनलाईन प्रवेश घेताना आपणांस माहिती भरणे सोयीस्कर होईल. ऑनलाईन प्रवेशासंदर्भात पालकांना कोणतीही अडचण येऊ नये अथवा आलेल्या अडचणीं तात्काळ निवारण करण्याची सोय करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सचिन जगताप यांनी दिली आहे.

---

**क.ग.दि. मोरे महाविद्यालयात कथाकथन कार्यक्रम संपन्न**

**नेहमी सकारात्मक राहून जीवनाचा आनंद घ्या**

# प्रत्येकात एक साहीत्यिक दडलेला असतो तो बाहेर काढला पाहिजे : कथाकार राजेंद्र गहाळ




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : कथा कविता कादंबरी आत्मचरित्र चरित्र यातून मानवी जीवनाचे चित्रण होत असते. समाजातील आजूबाजूला घडणाऱ्या घटना याची नोंद साहित्यातून घेतली जाते. प्रत्येक व्यक्तीकडे अनेक सुखदुःखाचे अनुभव असतात कटू गोड आठवणी साठलेल्या असतात, याचे लेखन केले तर एक सुंदर कथा कादंबरी तयार होत असते. प्रत्येकात एक साहित्यिक दडलेला असतो तो बाहेर काढला पाहिजे आणि आपले अनुभव आपले विचार लिहिले गेले पाहिजेत असे मत प्रसिद्ध कथाकार कोंडी, पोशिंदा, दोन एकर या कथासंग्रहाचे लेखक राजेंद्र गहाळ परभणी यांनी व्यक्त केले. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी कथाकथनांचा विशेष कार्यक्रम (बुधवार दिनांक ७ मे रोजी) आयोजित केला. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, सुदाम खैरनार, डॉ. प्रवीण ढेपले, डॉ. रोहिदास शिंदे, प्रा. योगेश कडलग, प्रा. डॉ. महेश बनकर, सागर सोनारे, रावसाहेब पवार आदी उपस्थित होते.

राजेंद्र गहाळ यांनी ' जरीचा पटका ' या ग्रामीण कथेचे सादरीकरण कथाकथनाच्या माध्यमातून करत, उपस्थितांसमोर मुग्या नावाच्या मुलाचे भावविश्व, संघर्षमय जीवन कहाणी हुबेहूब वठवली. शेती - माती, गरिबी, अशिक्षितपणा यातून वाट काढत शिक्षणाची कास धरत यशस्वी आयुष्याची वाटचाल त्यांनी ग्रामीण भाषा व विनोदी शैलीने सांगत प्रेक्षकांना खळखळून हसवत शेवटी त्यांच्या डोळ्यांच्या कडा ओलावत सर्वांना अंतर्मुख केले.

त्यांनी कथेच्या माध्यमातून कथा लेखन कसे करावे हे उपस्थितांना विविध कथांचे दाखले देत सांगितले.

प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी अध्यक्षीय मनोगतात सांगितले की, विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यासाठी आपण नेहमीच उपक्रम घेतो परंतु शिक्षकेतर सेवक यांचा कामाचा ताणतणाव कमी करून त्यांनाही साहित्याचा निखळ आनंद घेता यावा यासाठी मराठी विभागाचा हा उपक्रम विशेष महत्वाचा आहे, जरीचा पटका कथेतील अनेक प्रसंग व अनुभव आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात कमी-अधिकपणे अनुभण्यास मिळतात, म्हणून सर्वांनी आपले वैयक्तिक अनुभव लिहा यातूनच काही कथाकार निर्माण होतील, तसेच नेहमी सकारात्मक राहून जीवनाचा आनंद घ्या असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. रोहिदास शिंदे यांनी केले तर पाहुण्याचा परिचय व आभार प्रदर्शन डॉ. महेश बनकर यांनी केले.

या व्याख्यानासाठी महाविद्यालयातील सर्व कार्यालयीन सेवक आणि चतुर्थ श्रेणी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### अज्ञात चोरट्यांनी महिलेचे गंठण हिसकावले

सोलापूर : शांती चौक येथे पती-पत्नी दुचाकीवरून जाताना पाठीमागून आलेल्या भरगाव दुचाकीवरील अज्ञात दोघा चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील सव्वातीन तोळे वजनाचे तब्बल दीड लाखांचे मंगळसूत्र हिसकावून नेल्याची घटना मंगळवारी (दि.६) रात्री घडली. याप्रकरणी जया नागेश पल्ली (रा. सुवर्ण कला अपार्टमेंट, विडी घरकुल) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### पार्क केलेली दुचाकी पळविली

सोलापूर : विजापूर वेस येथील स्टार हॉटेल समोर पार्क करून ठेवलेली दुचाकी (क्रमांक एम एच ४५ ए आर ३४६३) ही चोरून नेल्याची घटना बुधवारी घडली. याप्रकरणी इरफान मेहबूब मुलाणी (वय-४०, रा. मु. पो. पिलीव, ता. माळशिरस) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# श्रमजीवीने रोखली अल्पवयीन मुलीची विक्री; ११जणांवर गुन्हा दाखल

## अल्पवयीन मुलीची लग्नाच्या नावाखाली विक्री करण्याचा धक्कादायक प्रकार; श्रमजीवी संघटनेमुळे उजेडात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पिलंझे गावात केवळ एक लाख वीस हजार रुपयांच्या मोबदल्यात एका अल्पवयीन कातकरी मुलीचा विवाह लावून देण्याचा गंभीर प्रयत्न उघडकीस आला असून, या प्रकाराने मानवी विक्रीसारखी गंभीर मानवताविरोधी कृती उजेडात आली आहे. श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या सतर्कतेमुळे हा सौदा थांबवण्यात यश आले. या प्रकरणी गणेशपुरी पोलीस ठाण्यात ११ जणांविरोधात बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार तसेच मानवी अपव्यापाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रमजीवी संघटनेचे संस्थापक तथा राज्यस्तरीय आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडित यांनी याबाबत संताप व्यक्त केला आहे. कुणाचा कितीही दबाव आला तरी त्या दबावाला बळी न पडता याबाबत कायदेशीर कारवाई करा व जे कोणी याममध्ये सहभागी असतील त्यांना आरोपी करा अशा सूचना पंडित यांनी पोलिसांना दिल्या आहेत. असे प्रकार रोखण्याचे ज्यांचे कर्तव्य आहे ते ग्रामविकास अधिकारी, पोलीस पाटील इत्यादी शासनाचे ग्राम पातळीवरील कर्मचारी कर्तव्य पार पाडीत नसल्याचे सांगत पंडीत यांनी नाराजी व्यक्त केली.

नगर येथील व्यक्तींकडून पैसे घेऊन त्या मोबदल्यात मुलीचे त्यांच्या मुलासोबत लग्न लावून देत असल्याची माहिती श्रमजीवीचे कार्यकर्ते दयानंद पाटील यांना कळली.

लग्नाचे वऱ्हाड हा विवाह पार पडून नवर देवाच्या गावाकडे परत निघाले असल्याची माहिती, श्रमजीवी संघटनेचे कार्यकर्ते दयानंद पाटील यांना मिळताच . त्यांनी तातडीने हस्तक्षेप करत वऱ्हाडाची गाडी थांबवली आणि संपूर्ण प्रकाराची माहिती संघटनेचे संस्थापक तथा आदिवासी आढाव क्षेत्र अध्यक्ष विवेक पंडित यांना दिली, दरम्यान याबाबत गणेशपुरी पोलिसांना कळवल्यानंतर गणेशपुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिपान सोनवणे यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसह तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन नवरा मुलगा, मुलीच्या वडिलांसह वऱ्हाडातील इतर सदस्य आणि दलाल अशा एकूण ११ जणांना ताब्यात घेतले. सर्वांविरोधात बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करून त्याना अटक करण्यात आली आहे.

**ही घटना समाजात सुरू असलेल्या मुलींच्या सौद्यांच्या, बळजबरीच्या आणि कायदेशीर वयापूर्वी लावल्या जाणाऱ्या लग्नांच्या प्रकारांची गंभीरता दर्शवते . श्रमजीवी संघटना आणि पोलिस प्रशासनाच्या वेळीच झालेल्या कृतीमुळे या अल्पवयीन मुलीचे भवितव्य उध्वस्त होण्यापासून वाचले आहे. यापूर्वीही असे अनेक प्रकार घडले असून त्यांची चौकशी करावी अशी मागणी श्रमजीवी संघटनेने केली आहे.**

# स्वेरीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात 'क्षितिज २ के २५' हा उपक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये मेसा तथा मेकॅनिकल इंजिनिअरिंग स्टुडंटस असोसिएशन आणि द इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), कोलकाता स्टुडन्ट चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात 'क्षितिज २ के २५' हा उपक्रम संपन्न झाला.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेल्या या कार्यक्रमाच्या प्रास्तविकात मेसा समन्वयक प्रा. संजय मोरे यांनी 'क्षितिज २ के २५' या उपक्रमासंबंधी सविस्तर माहिती दिली. प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता डॉ. के.बी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शासकीय अनुदान मिळविण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या विविध योजना बाबत माहिती दिली. उदघाटनानंतर विद्यार्थ्यांनी कॅडवॉर पोस्टर प्रेझेंटेशन, टेक्नो क्वीज, कॅम्पस रिक्रूटमेंट प्रोग्राम अशा विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला. या स्पर्धा सुरळीत व नियोजनबद्ध पार पडल्या.




स्पर्धा जिंकणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. या स्पर्धेत १८ हजार रुपयांची बक्षिसे स्पर्धकांना वितरीत करण्यात आली. यावेळी श्वेता सगरे, अथर्व जोशी, वरद निरगुडे, प्रणाली जाधव या सोलापूरवरून आलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयी सुविधांबाबत संयोजकाचे कौतुक केले. 'क्षितिज २ के २५' या उपक्रमासाठी कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए. पी. केने, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. एस.बी. भोसले, आय.ई.आय. कोलकत्ता स्टूडंट चॅप्टरचे समन्वयक प्रा.डी. टी. काशीद, विद्यार्थी प्रमुख देवेश खरे, प्रणव पाटील व प्रतिक्षा चौधरी व कार्यक्रमासाठी आलेल्या विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी उपस्थित होते. ज्ञानेश्वरी मेटकरी व सोनाली कांबळे यांनी सूत्रसंचालन केले तर मकरंद कर्चे, प्रतिक शिंदे यांनी आभार मानले.

# संतुलित आहार आरोग्यासाठी अधिक उपयुक्त : अन्वेषा पात्रा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रोजच्या जेवणात विविध पोषणमूल्यांचा समावेश असलेला आहार केवळ शरीराला ऊर्जा तर पुरवतोच, पण रोगप्रतिकार शक्तीही वाढवतो. सुदृढ आरोग्यासाठी संतुलित आहार अत्यंत महत्त्वाचा आहे, असे इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या अन्वेषा पात्रा यांनी सांगितले.

टेक-वारी कार्यक्रमांतर्गत मंत्रालयात 'डब्यासाठीच्या आरोग्यदायी पदार्थांच्या पाककृती' या विषयावर अन्वेषा पात्रा यांचे व्याख्यान झाले.

अन्वेषा पात्रा म्हणाल्या, दिवसभराच्या कामकाजात ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी आणि आरोग्य उत्तम राखण्यासाठी ऑफिसच्या डब्याला विशेष महत्त्व आहे. फास्ट फूड तसेच पॅकेज्ड पदार्थांऐवजी घरचा पौष्टिक व संतुलित आहार असलेला डबा आरोग्यासाठी अधिक उपयुक्त ठरतो. मुलांच्या, आपल्या स्वतःच्या डब्यात प्रथिने, फायबर, जीवनसत्त्व, आणि कर्बोदके असणे आवश्यक आहे. डब्यात भाजी, डाळ, भात किंवा पोळी, फळ असावेत. फास्ट फूड, तेलकट, मसालेदार पदार्थ टाळून डब्यात सकस आणि सुलभ पचनारे पदार्थ समाविष्ट करावेत. यामुळे दिवसभर ऊर्जा टिकून राहते, थकवा कमी होतो आणि कामात लक्ष केंद्रित करता येते.

आजकाल अनेक पालक मुलांच्या डब्याचा आरोग्याच्यादृष्टीने विचार करून नियोजन करू लागले आहेत. ऑफिससाठी आठवड्याभराच्या डब्यातील आहाराचेही नियोजन करून वेळेचे व्यवस्थापन करता येते.

पदार्थ दिसायला आकर्षक आणि चवदार असावा, पण त्यासोबत तो पोषणमूल्यांनी भरलेला असणे आवश्यक आहे, असेही अन्वेषा पात्रा यांनी सांगितले. शेफ अंकित पिल्ले यांनी डब्यासाठीच्या रेसिपींचे प्रात्यक्षिकही यावेळी करुन दाखवले.

# प्रभावी उपचारांद्वारे थॅलेसेमिया मुक्तीचा निर्धार : सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

**'एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे' अभियानाचा भव्य शुभारंभ**

मुंबई : थॅलेसेमियासारख्या गंभीर अनुवंशिक रक्तविकाराविषयी जनजागृती निर्माण करण्याचा व्यापक प्रयत्न करण्यात येत असून प्रभावी उपचारपद्धतींद्वारे थॅलेसेमिया मुक्तीचा निर्धार करण्यात येत असल्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

८ मे आंतरराष्ट्रीय थॅलेसेमिया दिनानिमित्त सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागामार्फत एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे या महत्वाकांक्षी अभियानाचा शुभारंभ आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर व राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे - बोर्डीकर यांच्या हस्ते झाला.

या कार्यक्रमाला आरोग्य सेवा आयुक्त तथा संचालक आरोग्य अभियान श्री. रंगा नायक, संचालक आरोग्य सेवा डॉ. नितीन अबांडेकर, संचालक (शहरी) आरोग्य सेवा डॉ. स्वप्नील लाळे, अतिरिक्त संचालक डॉ. विजय बाविस्कर, सहसंचालक श्री. तुळशीदास सोळंके, डॉ. सुनीता गोल्हाईत, डॉ. गोविंद चौधरी, डॉ. सरिता हजारे, सहाय्यक संचालक डॉ. महेंद्र केंद्रे (राज्य रक्त कक्ष), तसेच थॅलेसेमिया ग्रुप परभणीचे डॉ. लक्ष्मीकांत पिंपळगावकर उपस्थित होते.



सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, थॅलेसेमिया रुग्णांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडविण्याकरिता आणि त्यांच्या संपूर्ण पुनर्वसनासाठी शासन विविध पातळ्यांवर प्रयत्नशील आहे. यामध्ये नियमित रक्त संक्रमण, बोन मॅरो ट्रान्सप्लांटसारख्या उपचारपद्धती उपलब्ध करून दिल्या जात आहेत. यासोबतच मोफत आरोग्य सल्ला व मार्गदर्शन केंद्रांची उभारणी देखील करण्यात आली असल्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी सांगितले.

**सकारात्मक परिणाम घडविणारा उपक्रम : सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे - बोर्डीकर**

शासनाचा हा उपक्रम केवळ एक कार्यक्रम न राहता, तो समाजात सकारात्मक परिवर्तन घडविणारा एक मोठा पाऊल ठरेल असा विश्वास सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे - बोर्डीकर यांनी व्यक्त केला. जनतेच्या सक्रिय सहभागाशिवाय ही लढाई जिंकता येणार नाही, हे स्पष्ट करत सर्व नागरिकांना या अभियानात सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले. सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे - बोर्डीकर म्हणाल्या, थॅलेसेमिया आजारावरील उपचारपद्धती आता प्रगत झाली असून यांसदर्भात अधिक जनजागृती करण्यात यावी. या उपक्रमांतर्गत थॅलेसेमिया टाळण्यासाठी विवाहपूर्व चाचण्यांचे महत्व अधोरेखित करण्यात आले. थोडीशी काळजी, पुढच्या पिढीचं आयुष्य वाचवू शकते या घोषवाक्याद्वारे उद्देशून जागरूकतेचा संदेश देण्यात आला. जीवन सक्षम बनवा, प्रगतीला स्वीकारा या अभियानाच्या मुख्य सूत्रातुन आरोग्यदृष्टीने सक्षम व थॅलेसेमिया-मुक्त महाराष्ट्राचा संकल्प अधोरेखित करण्यात आला आहे. यावेळी थॅलेसेमिया रुग्णांना दिव्यांग प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. www.thalesemiyasupport.com या वेबसाईटचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. मोफत आरोग्य सल्ल्यासाठी १०४ क्रमांक उपलब्ध असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# मानसिक शांतता, आरोग्यवर्धनासाठी संगीत प्रभावी माध्यम : डॉ. संतोष बोराडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मानवाच्या मानसिक, भावनिक आणि शारीरिक आरोग्यावर संगीताचा सकारात्मक परिणाम होतो, हे आता संशोधनातून सिद्ध झाले आहे. संगीत हे केवळ मनोरंजनाचे साधन न राहता, कार्यक्षमतेत वाढ, मानसिक शांतता आणि आरोग्यवर्धनासाठी प्रभावी माध्यम ठरू शकते, असे जीवनसंगीत समर्थक डॉ. संतोष बोराडे यांनी सांगितले.

टेक-वारी कार्यक्रमांतर्गत मंत्रालयात 'जीवन संगीत' या विषयावर डॉ. संतोष बोराडे यांचे व्याख्यान झाले.

डॉ. संतोष बोराडे म्हणाले, तंत्रज्ञान म्हणजे केवळ यंत्र नाही, तर जीवन जगण्याची आधुनिक पद्धती आहे. छोट्या-छोट्या गोष्टी समजून घेतल्यास जीवन अधिक सुलभ आणि आनंददायी होऊ शकत. आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात सतत अद्ययावत राहणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे हे जिवंतपणाच लक्षण आहे. संगीतामध्ये माणसाचे आयुष्य बदलण्याची ताकद असते. चांगले संगीत मनाला उभारी देते, विचारशक्ती प्रगल्भ करते आणि नातेसंबंधांमध्ये सौहार्द निर्माण करते. अनेकवेळा जीवनातील तणाव, नैराश्य, किंवा अडचणींच्या वेळी संगीतच माणसाला मानसिक आधार देते. डॉ. बोराडे यांनी या सत्रात ओव्या, गीत आणि संगीताच्या माध्यमातून तंत्रज्ञानाच्या वापराबद्दल उपस्थितांशी संवाद साधला. तंत्रज्ञान हे सतत अद्ययावत राहण्याची प्रक्रिया आहे. रोज काहीतरी नवीन शिकण्याची वृत्ती अंगीकारली, तर वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवन दोन्ही समृद्ध होऊ शकते असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकर शुक्राचार्य भोसले यांचे संपर्क साधण्याचे आवाहन**

# राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया अंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनीना १४ मे पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबिया सन २०२५-२६ अंतर्गत सोयाबीन पीकासाठीसोलापूर जिल्हाची निवड करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत मुल्य साखळी भागीदार (VCP) यांचे मार्फत संपुर्ण जिल्हातील कार्यक्षेत्रात समुहामध्ये प्रमाणित बियाणे वितरण, शेतकरी प्रशिक्षण व शेतीशाळा इ. घटक राबवायचे आहेत. याकरीता खालील निकष पुर्ण करणारे शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्था यांची निवड करावयाची आहे.

मुल्य साखळी भागीदार (तउझ) म्हणुन निवड करावयाच्या शेतकरी उत्पादक कंपनीकरीता पुढील प्रमाणे पात्रता निकष असणार आहेत. यामध्ये कंपनी कायदा किंवा सहकारी कायद्यांतर्गत नोदणी केलेली असावी. ज्या जिल्हात समुह तयार झाला आहे, तेथे काम करण्याचा किमान ३ वर्षाच अनुभव असावा, म्हणजेच नोंदणी माहे मार्च, २०२२ पुर्वीचा असावा. किमान २०० शेतकरी, उत्पादक कंपनी मध्ये किंवा सहकारी संस्थेमध्ये नोदंणीकृत असावेत. सहकारी संस्था असल्यास संस्थेच्या उद्यिष्टामध्ये तेलबिया पिकांत कामकाजाबाबत नमुद असावे. मागील ३ वर्षातील सरासरी वार्षिक उलाढाल ९ लाख रूपयापेक्षा जास्त असावी. शेतकरी उत्पादक कंपनी मध्ये शेतकएयांचा किमान ३ लाख रूपयांचा सहभाग असावा. शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्था प्राधान्याने कमी उत्पादकता असणाऱ्या तालुक्यामध्ये कार्यरत असावी. सरकारकडून अनुदान प्राप्त कर्त्या शेतकरी उत्पादक संघाला प्राधान्य दिले जाणार आहे. रू. १०,००० शेतकरी उत्पादक संघ योजनेअंतर्गत तयार केलेले शेतकरी उत्पादक कंपनी, छत्रएऊ छडउ-जड इत्यादी सार्वजनिक संस्थाकडे नोंदणीकृत तेलबियाशी संबंधित शेतकरी उत्पादक कंपनी यांना वरील पात्रता निकषाच्या पुर्ततेच्या अधीन राहुन प्राधान्य दिले जाणार आहे.

या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेच्या अधीन राहून वरील निकषांचे पुर्तता करणारे इच्छूक शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्था यांनी सोयाबीन पिकासाठी दि. १४ मे, २०२५ पर्यत वरील निकषाच्या आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह संबधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयाकडे कंपनीच्या लेटर हेडवर संचालक मंडळाच्या ठरावासह अर्ज सादर करावेत. अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी कार्यालयास संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकर शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

# नागरिकांना दिलासा आणि उद्योग सुलभतेसाठी 'डिक्रीमिनलायझेशन' महत्त्वाचे पाऊल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : उद्योग व्यवसायाचे सुलभीकरण (इज ऑफ डुईंग बिझनेस) आणि नागरिकांचे जीवन अधिक सोयीचे, सुरक्षित व सुलभ करण्याच्या उद्देशाने कायद्यामधील तरतुदीचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला.




सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या सामंजस्य करारावर विधी व न्याय विभागाचे सचिव सतीश वाघोले, विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसीचे अर्घ्य सेनगुप्ता यांनी स्वाक्षरी केली.

याप्रसंगी विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसीचे जीनाली दानी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन आणि विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी यांच्यात सामंजस्य करार**

या सामंजस्य कराराच्या माध्यमातून नागरिकांना दिलासा देणारे कायदेमान्य वातावरण निर्माण व्हावे, उद्योग सुलभतेला गती मिळावी आणि उद्योग व्यवसायांच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण करणारे कठीण आणि फौजदारी स्वरूपाच्या कायद्यांचे पुनरावलोकन करता यावे यासाठी 'डिक्रीमिनलायझेशन' करण्यात येणार आहे. यासाठी विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसीकडून राज्यातील कायद्यातील तरतुदीचा अभ्यास करून त्याचा अहवाल सामान्य प्रशासन विभागाला सादर करण्यात येणार आहे.